# सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सह. साखर कारखाना लि; अमृतनगर

पो. संगमनेर एस. के. ४२२६०८, तालुका– संगमनेर, जिल्हा– अहमदनगर
तार– संगमसाकर, फोन :– २२५३७०, २२५३९९, २२५४५७
फॅक्स नं. ०२४२५ – २२५४२५
ई–मेल : amrutsugar@yahoo.co.in वेबसाईट : www.thoratsugar.com




जावक नंबर : सभाथोससाका/शेतकी/१७१०/२०१९ दिनांक : ११/०८/२०१९

## परिपत्रक

# सन २०२०-२०२१ या गळीत हंगामासाठी ऊस वाढीकरीता ठिबक सिंचन योजना

कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांनी ऊस, केळी, फळबाग इ. बारमाही पिकांसाठी शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन, तुषार सिंचन किंवा अन्य पाण्याची बचत करणारे तंत्र वापरल्याखेरीज ३१ ऑक्टोबर २०२० नंतर जलाशयातुन पाणी उपलब्ध करुन दिले जाणार नाही. या आदेशाचे पालन न करणाऱ्यांची जलाशयावरील पाणी उपसा परवानगी रद्द केली जाईल असा निर्णय महाराष्ट्र नियमन प्राधिकरणाने घेतला आहे.

त्यामुळे कारखान्याचे मा. संचालक मंडळाने ऊस वाढीसाठी ठिबक सिंचन अनुदान योजना पुढील प्रमाणे राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

१) दि. ०४/०६/२०१९ चे परिपत्रकानुसार जे ऊस उत्पादक शेतकरी सन २०२०–२०२१ चे गळीत हंगामाकरीता ठिबक सिंचनावर आडसाली, पुर्व हंगामी, सुरु व खोडवा/निडवा ऊस पिक घेतील त्यांना ऊस गळीतास आल्यानंतर प्रति मे. टनास १००/– रुपये प्रमाणे अनुदान देण्यात येईल.

२) तसेच ज्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सन २०२०–२०२१ चे गळित हंगामात आडसाली, पुर्व हंगामी, सुरु व खोडवा/निडवा ऊस पिकासाठी ठिबक सिंचन बसवायचे आहे, त्यांना प्रति एकर फक्त ३००० मिटर पेप्सी लॅटरल कारखान्यामार्फत मोफत दिली जाईल. ठिबक सिंचन संचासाठी लागणारे इतर साहित्य शेतकऱ्यांना स्वत: खरेदी करावे लागेल.

### * शर्ती व अटी

ज्या शेतकऱ्यांना ऊसाकरीता वरिल प्रमाणे पेप्सी ठिबक सिंचन करावयाचे आहे. त्यांनी ७/१२ उतारा व दोन ऊस उत्पादक सभासद जामिन म्हणुन देणे आवश्यक आहे. सरीची रुंदी ४.५ फुट पेक्षा कमी नसावी व क्षेत्र ०.२० हे. च्या पुढे असणे बंधनकारक आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांचा ऊस गळीतास येणार नाही अथवा त्यांनी लॅटरलचा वापर अन्य पिकासाठी केल्यास त्यांचेकडून किंवा त्यांचे जामिनदारांचे ऊस पेमेंट अथवा इतर देय पेमेंट लॅटरलची होणारी रक्कम व्याजासह वसुल केली जाईल.

तरी कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त ऊस लागवड व खोडवा पिक घेण्यासाठी व ठिबक सिंचन करून वरील प्रमाणे अनुदान योजनेचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी कारखान्याचे गट ऑफिस किंवा शेतकी ऑफिस मध्ये संपर्क साधावा हि विनंती.

आपले विश्वासू ,

| जगन्नाथ भाऊराव घुगरकर | भाऊसाहेब दामोधर कुटे | ॲड. माधवराव सावळेराम कानवडे |
| --- | --- | --- |
| कार्यकारी संचालक | व्हाईस चेअरमन | चेअरमन |

**सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लि; अमृतनगर**